# प्रेमानंद 'अे' सहकारी गृहरचना संस्था (मर्यादीत)

प्लॉट नं. ९९२/९९३/३०/२, राजेंद्रनगर, नवी पेठ, पुणे ४११०३०

---

दिनांक : २५/०९/२०२३

## विशेष सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत

आपल्या सभेची विशेष सर्वसाधारण सभा रविवार, दि.१७/०९/२०२३ रोजी सकाळी ११.०० (अकरा) वाजता इंद्रधनुष्य सभागृह, राजेंद्रनगर, तेंडुलकर गार्डन समोर, पुणे – ४११०३० येथे आयोजित करण्यात आली होती. तथापि काही तांत्रिक कारणास्तव सभेचे स्थळ बदलून ''महाराष्ट्र साहित्य परिषद'', टिळक रोड, पुणे – ४११०३० येथे बोलाविण्यात आली. गणसंख्येअभावी सदरची सभा मा. अध्यक्ष यांनी अर्धातास तहकुब करून सदरची सभा त्याच ठिकाणी भरेल व त्यास गण संख्येची आवश्यकता नाही असे जाहिर केले. सदरची सभा अर्धातासानंतर मा. अध्यक्ष श्री. केदारनाथ निकम यांच्या परवानगीने सुरू करण्यात आली.

कार्यपत्रिकेवरील विषय घेण्याअगोदर आपल्या संस्थेच्या पुनर्विकास कामाचे विकसक मे. गंगोत्री होम्स् यांचे उपस्थित असलेले श्री. गणेश जाधव, श्री. मकरंद केळकर आणि श्री. राजेंद्र औटे, श्री. संजय औटे यांचा सत्कार संस्थेचे सभासद श्री. उदय सोनाळकर यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच नवनिर्वाचित अध्यक्ष, सचिव आणि खजिनदार यांचाही सत्कार श्री. वसंत देसाई यांच्या हस्ते करण्यात आला व इतर कार्यकारिणी सदस्यांचा सत्कार श्री. गणेश द्रविड यांचे हस्ते करण्यात आला.

मा. अध्यक्ष श्री. केदारनाथ निकम यांनी सभेस सुरवात करणेबाबत मा. सचिव श्रीमती वासवी बक्षी यांना कार्यपत्रिकेवरिल विषय घेणेबाबत सूचना केली. त्यानुसार मा. सचिव यांनी विषय पत्रास सुरवात केली.

**विषय क्र. १ :** मागील सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे.

**ठराव क्र. १ :** मागील सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व त्यास मान्य करण्याचे ठरले.

ठराव सवानुमते मान्य.

सूचक : श्रीमती प्रेरणा पटवर्धन अनुमोदक : श्री. महेश झगडे

**विषय क्र. २ :** विकसक मे. गंगोत्री होम्स यांचेबरोबर संस्थेच्या पुनर्विकास कामाचे करावयाच्या ''विकसन करारनामा कुलमुखत्यार पत्र'' यांच्या मसुद्यास चर्चा करून त्यावर निर्णय घेणे.

**ठराव क्र. २ :** विकसक मे. गंगोत्री होम्स यांचेबरोबर संस्थेच्या पुनर्विकास कामाचे करावयाच्या ''विकसन करारनामा कुलमुखत्यार पत्र'' हे प्रोजेक्टरद्वारे विकसक मे. गंगोत्री होम्सचे मा. श्री. गणेश जाधव यांनी मुद्देसुद माहिती उपस्थित सभासदांना समोर सादर करण्यात आली.

# प्रेमानंद 'अे' सहकारी गृहरचना संस्था (मर्यादीत)

प्लॉट नं. ९९२/९९३/३०/२, राजेंद्रनगर, नवी पेठ, पुणे ४११०३०

या प्रसंगी श्री. राहुल साळुंके यांनी (पुनर्विकास कमिटी सदस्य) सोलर सिस्टीम बसविण्यात येणार असल्याने त्याच्याखाली वापरण्यायोग्य मोकळी जागा राहिल का? तसेच ज्यादा क्षेत्रफळ जर सभासदांच्या वारसाने घेतले तर त्यावर वारसाचे नाव लावता येईल का? असे प्रश्न विचारले याबाबत मा. जाधव व मा. काबरा मॅडम यांनी सविस्तर माहिती देवून उपस्थितांच्या शंकेचे निरसन केले.

ठराव सवानुमते मान्य.

सूचक : श्रीमती लता जाधव अनुमोदक : श्री. सोमनाथ निकम

**विषय क्र. ३ :** संस्थेच्या पुनर्विकास कामाचे विकसन करारनाम्यावर/ सदनिका धारकाने स्वाक्षरी केली नाहीतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा विचार करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. ३ :** संस्थेच्या पुनर्विकास कामाचे विकसन करारनाम्यावर एखाद्या सभासदाने / सदनिकाधारकाने/वारसाने स्वाक्षरी केली नाही तर विकसन कामात अडथळा येवून उशीर होवू नये म्हणून विकसन करारनाम्यावर स्वाक्षरी न करणाऱ्या सभासदांची नावे विकसक करारनाम्यातून वगळण्यात यावी.

सदरची कार्यवाही करताना पूर्वी विशेष सर्वसाधारण सभेत ठरल्याप्रमाणे त्या व्यक्तीकडून संस्थेच्या विकसन कामात अडथळा आणणाऱ्या व्यक्तीकडून संस्थेच्या झालेल्या / होणाऱ्या नुकसान भरपाईबाबत दावा करण्याचा अधिकार ''अबाधित'' राखून सदरची कार्यवाही करण्यात यावी.

विकसन कामात अडथळा आणणाऱ्या सभासद/सभासदांचे वारसदार इ. विरूद्ध सक्षम न्यायालयात संस्थेच्या वतीने दावा दाखल करणेत यावा. अश्या दाव्यावर संस्थेच्या वतीने स्वाक्षरी करण्याचे, प्रतिज्ञापत्र, वकिलपत्रावर स्वाक्षरी करणे, सुनावणीस हजर राहणे, व अन्य सर्व कामे करण्याचे अधिकार संस्थेच्या वतीने मा. अध्यक्ष व मा. सचिव यांना देण्यात येत आहे. या विषयाबावत साधक बाधक चर्चा करून सदरचा विषय मान्य करण्याचे ठरले.

ठराव सवानुमते मान्य.

सूचक : श्री. वसंत देसाई अनुमोदक : श्री. तुषार ब्रह्मे

**विषय क्र. ४ :** आयत्यावेळी कोणताही विषय न आल्याने मा. अध्यक्ष यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

ठराव सवानुमते मान्य.

सूचक : श्री. जयंत फडके अनुमोदक : श्री. गणेश लाड

प्रेमानंद अे सहकारी गृहरचना संस्था मर्या.

***** अध्यक्ष सचिव खजिनदार